INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 6.865 (SJIF 2023)

# सुफी संत चांद बोधले: एक दृष्टिक्षेप
# (Sufi Saint Chand Bodhle: An Overview)

**प्रा. डॉ. के. डी. सावंत**

इतिहास विभाग प्रमुख,
महिला महाविद्यालय, गेवराई, जि. बीड.
E-mail: kailassawant09@gmail.com

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/06.2023-21758874/IRJHIS2306006

**प्रस्तावना** :

महाराष्ट्राची भूमी ही संत महात्म्यांची भूमी आहे. मध्ययुगीन कालखंडामध्ये मुस्लिम संतांची कामगिरी लक्ष वेधून घेणारी आहे, राष्ट्रीय एकात्मतेचा पुरस्कार करणारी आहे. भारतातील संतांनी भारतीय एकात्मतेचा पाया घातल्याचा दिसतो. भारतीय एकात्मतेचे हे शिल्प घडविणाऱ्या मुसलमान शिल्पकारात जसे उतरलेले कबीर रहीम, रसखान इत्यादी संत आहेत, तसेच महाराष्ट्रातले शहामतोंजी ब्राह्मणी, हुसेन अंबरखान, अलमखान, शेख सुलतान, शेख महंमद वाजिद पठाण शहाबेग, जंगली फकीर, जमाल फकीर, लतीफशहा गरीब अब्दुल त्यापैकीच एक चांद साहेब कादरी उर्फ शहामुनी चांद बोधले हे होत. प्रस्तुत शोधनिबंधात साहेब कादरी उर्फ शहामुनी चांद बोधले यांच्या कार्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे.

मध्ययुगीन कालखंडापासून मुस्लिम समाजाचे भारतीय इतिहासात महत्त्वपूर्ण स्थान आहे. हिंदवी स्वराज्य उभारणीत त्यांचे महत्त्वाचे योगदान राहिल्याचे दिसते. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात ही ते अग्रेसर असलेले दिसतात. ते निजाम राजवटी विरुद्ध लढताना दिसतात तसेच भारतीय एकात्मता घडवणाऱ्या ज्या संत महात्म्यांनी कार्य केले आहे. त्यात मध्ययुगीन मराठी मुस्लिम सुफी संतांचे कार्य अमूल्य आहे. म्हणूनच आजही महाराष्ट्राच्या भूमीत जिथे जिथे दर्गा आहेत तिथे बहुजन समाजातील जनता मोठया संख्येने एकत्रित येत असल्याचे दिसते. महाराष्ट्रात जिथे जिथे दर्गा आहे तिथे तिथे सुखी संत अवली याची समाधी असल्याचे दिसते. या प्रत्येक समाधीस्थळावर वर्षानुवर्ष उरूस भरत असल्याचे दिसते. हे बहुतेक सर्व सुफी संत बहुजन समाजातील असल्याचे दिसतात. म्हणून त्यांचे भक्तगणाची बहुजन समाजातीलच असल्याचे दिसतात. या सुखी संतामुळेच इथे भारतीय दर्गा संस्कृती निर्माण झालेली दिसते.

**सुफी संत चांद बोधले यांचे सुफी पंथातील कार्य** :

सोळाव्या शतकातील सुफी संतातील सुफी संत चांद साहेब कादरी उर्फ शहामुनी चांद बोधले हे एक होत. यांनी बहुतेक सर्व मराठी वाङ्मयाचे इतिहासकारांनी त्यांची व त्यांच्या महत्त्वपूर्ण कार्याची तसेच त्यांनी निर्माण केलेल्या शिष्य परंपरेची नोंद केलेली दिसते. संत एकनाथ महाराज यांचे गुरु चांद बोधलेच असल्याचे दिसतात. श्री वा सी बेंद्रे यांनी 'तुकाराम महाराजांचे संत सांगती'[1] डॉ. रा.ची. ढेरे[2] आणि डॉ. ब्रम्हानंद देशपांडे[3] यांनी चांद बोधले यांच्या विषयी आपापली अभ्यासपूर्ण मत मांडलेले

दिसतात. सुफी संत चांद बोधले यांना वारकरी व सुफी परंपरेत मोठी मान्यता असल्याचे दिसते.

महीपतांच्या 'भक्ती विजय' व 'संत विजय' या ग्रंथात चांद बोधले यांचा उल्लेख आल्याचा दिसतो. जनार्दन पंतांनी संत एकनाथ महाराजांना आपल्या गुरुच्या दर्शनाला नेले व हे गुरु यवन होते, अशा आशयाच्या दोन कथा भक्त विजयाच्या 40 व्या अध्यायात असल्याचे

वा.सी. बेंद्रे म्हणत असल्याचे दिसतात.[4]

डॉ. रा.ची. ढेरे यांनी चांद बोधले म्हणजे सुफीच्या कादरी शाखेचे संत सय्यद चांद साहेब कादरी हे होते.[5] हे पुढील सविस्तर विवेचनात स्पष्ट केले आहे.

शेख महंमद यांनी 'योगासंग्रामात' आपल्या गुरूचा स्पष्ट उल्लेख केल्याचा दिसतो. डॉ. नमो जी सद्गुरु चांद बोधले। त्यांनी जाणव पंता अंगीकारले । तानीबाने एका उपदेशिले । दासत्वगुणे ।।

वरील अवतरणातून शेख महंमद आणि जनार्दन स्वामी हे गुरुबंधू होते ही वस्तुस्थिती असल्याचे दिसते.

महंमद गौस राजे महंमद यांचे गुरु होते, तर चांद बोधले हे जनार्दन स्वामी व शेख महंमद यांचे गुरु असल्याचे दिसतात. तर संत एकनाथ महाराज हे जनार्दन स्वामी यांचे शिष्य असल्याचे दिसतात. तर संत एकनाथ महाराज हे जनार्दन स्वामी यांचे शिष्य असल्याचे दिसतात. पारंपारिक समजुतीप्रमाणे जनार्दन स्वामींचे गुरू श्री दत्तात्रय असल्याचे दिसतात. परंतु अनेक ऐतिहासिक पुराव्यांनी ही गोष्ट स्पष्ट होत आहे की जनार्दन स्वामींचे गुरु पौराणिक दत्तात्रय नसून दत्तावतारी समजले जाणारे सत्पुरुष चांद बोधले हेच होत असे दिसते. ते गुरू परंपरेने सुफी साधू असल्याने सुफी वेशात म्हणजे मलंग देशात राहत असल्याचे दिसते. नाथांच्या पारंपारिक चरित्रात मलंग वेश्याने दर्शन देणाऱ्या दत्तात्रयाचा जो उल्लेख येतो तो दत्तात्रय म्हणजे हे मलंग वेशात वावरणारे दत्ता अवतारी साधू चांद बोधले असल्याचे दिसते.

संत एकनाथ महाराजांच्या परंपरेतील अनेक सत्पुरुषांनी ही वस्तुस्थिती मान्य केलेली दिसते. स्वत: शेख महंमद हे चांद बोधले यांना नमन करत असल्याचे दिसतात. 'तुम्ही महावरिष्ठ दिगंबर' 'जय जय सद्गुरू दिगंबर' अशा शब्दांत चांद बोधले यांचे दत्तावतारीत्व व सुचित होत असल्याचे दिसते. शेख महंमद यांना परमबोधाचा अधिकारी बनविणारे हे चांद बोधले मोठे प्रभावशाली साधू असल्याने त्यांचा निजामशहावर अत्यंत प्रभाव असल्याचा दिसतो.

शेख महंमद यांनी आपल्या गुरुला 'अजमतेचे धनी' म्हणजे 'सिद्धीचे स्वामी' म्हटल्याचे दिसते. या प्रभावामुळेच पुढे निजामशाहीत बोधले आणि त्यांचा शिष्य परिवार यांना विशेष प्रतिष्ठा लाभलेली दिसते. जनार्दन स्वामींनी बांधलेले चांद बोधल्यांची समाधी देवगिरी किल्ल्याच्या पायथ्याशी आजही दिसते. चाद बोधले यांनी सुफी साधना आणि सुफी वेश स्वीकारलेला असल्याने ते हिंदू असूनही त्यांचे समाधी मंदिर दर्ग्याच्या स्वरूपात असल्याचे दिसते.

'योग संग्रामात' व आपल्या अन्य रचनांत शेख महंमद चांद बोधले (चांदसाहेब कादरी) यांचा उल्लेख करतात. त्यांच्या सिजराजादी कादरीला तर प्रमाण मामालाच हवं, त्यातही हा उल्लेख आल्याचा दिसतो. गौस महंमद राजे महंमद (शेख महंमद यांचे वडील) चांद बोधले (चांदसाहेब कादरी) शेख महंमद अशी एक शाखा व परंपरा तर निश्चितच असल्याचे दिसते. चांद बोधले जनार्दन स्वामी संत एकनाथ महाराज ही दुसरी शाखा व परंपरा असल्याचे दिसते.

**सारांश** :

मध्ययुगीन भारताच्या इतिहासात सुफी संप्रदायाला भारतातील इतर संप्रदायाप्रमाणेच विशेष महत्त्व असल्याचे दिसते. भारतातील मुस्लिम राजवटींना बळकटी देण्यामध्ये सुफी साधू यांचे फार मोठे योगदान राहिल्याचे दिसते. चांद बोधले यांनी मुस्लिम

हिंदू एकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. तसेच समाज जागृतीचे किंवा समाज प्रबोधनाचे प्रभावी कार्य केल्याचे दिसते. हिंदू असूनही त्यांनी सुफी संप्रदायाला प्रचार आणि प्रसार केलेला दिसतो. तसेच निजमावर त्यांच्या कार्याचा प्रभाव असल्याचा दिसतो. चांद बोधले हे सुफी साधुतील एक प्रभावी सुफी साधू असल्याचे दिसते.

**संदर्भ सूची** :


1) बेंद्रे वा.सी., तुकाराम महाराजांचे संत सांगाती, मौज प्रकाशन, मुंबई, 1958, पृष्ठ - 61.
2) डॉ. ढेरे रा.चि., एकात्मतेचे शिल्पकार, मंजुल प्रकाशन, पुणे, 1958, पृष्ठ -80.
3) डॉ. देशपांडे ब्रम्हानंद, तीन शोध निबंध, परिचय प्रकाशन, औरंगाबाद, 1972, पृष्ठ 30.
4) बेंद्रे वा.सी., तुकाराम महाराजांचे संतसांगाती, उपरोक्त, पृष्ठ 60.
5) डॉ. ढेरे रा.चि., एकत्मतेचे शिल्पकार, उपरोक्त, पृष्ठ 81.